# स्वर्गीय ठेवा
## आणि
# आपण सारे भाऊ

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**स्वर्गीय ठेवा आणि आपण सारे भाऊ : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २३०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका

- स्वर्गीय ठेवा /५
- आपण सारे भाऊ /१३५

✦✦

# स्वर्गीय ठेवा

# अनमोल ठेवा

गुरुजींनी विविध प्रकारचे लिखाण त्यांच्या आयुष्यात केले. लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या गोष्टी हा आपला एक अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. गेली पन्नासहून अधिक वर्षे प्रत्येक उमलत्या पिढीच्या हातातून ही पुस्तके गेली आहेत. आजच्या बदलत्या सांस्कृतिक वातावरणात तर या पुस्तकांचे मूल्य अधिकच वाढले आहे.

प्रत्येक सुजाण पालकाने, शिक्षकाने आपल्या मुलांनी या गोष्टी वाचाव्यात, समजून घ्याव्यात यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

साने गुरुजींच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून आम्ही हा ठेवा आमच्या बाल–वाचकांच्या हातात देत आहोत.

## दोन शब्द

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत मेरी कॉरिली या विख्यात इंग्रज कादंबरी लेखिकेच्या कादंबऱ्या आपल्याकडे अत्यंत प्रिय झाल्या होत्या. तिच्या अनेक कादंबऱ्यांची मराठीत भाषांतरे झालेली आहेत. मी ज्या कादंबरीतील गोष्ट सांगत आहे, तिचे नाव 'ट्रेझर ऑफ हेवन' (स्वर्गीय ठेवा) असे आहे. गोष्ट अतिसुंदर आहे. अनेक ठिकाणी मी ती तोंडाने सांगितली आहे. जशी मी ती सांगत असे तशी मी ती लिहून काढली आहे. सर्वांना ती आवडो.

**– पां. स. साने**

# १

मध्यरात्र होत आली होती. मुंबई शहरात सर्वत्र शांतता होती. दळणवळण जवळजवळ थांबले होते व ट्रामगाड्यांचा खडखडाट ऐकू येत नव्हता. मोटारींचे पो पो बंद झाले होते. दिवसभर थकले-भागलेले सारे जीव झोपी गेले होते. सिनेमाचा शेवटचा खेळ अजून सुरू होता. रात्रपाळीच्या गिरण्यांतून काम चालू होते कोठे क्वचित गाणे चालू होते. कोठे नृत्यही सुरू होते. परंतु एकंदरीत पाहिले तर सबंध सामसूमच होते.

वरचे काळेनिळे अनंत आकाशही अत्यंत शांत वाटत होते. अनंत तारे चमचम करीत होते. ते विश्वाच्या विश्वंभराची कल्पना आणून देत होते. ते पृथ्वीकडे शांत बघत होते. ज्या प्रभूला कोणी विचारीत नाही, ज्याच्या इच्छेविरुद्ध दुनियेत क्षणाक्षणाला गोष्टी होत आहेत, अपराध केले जात आहेत, त्या प्रभूचे मुके पहारेकरी गंभीरपणे वरून पाहात होते.

मलबार टेकडीवर मोटारी अजूनही जात-येत होत्या. बाहेर कुठल्या तरी राजविलासी हॉटेलातून खाऊन-पिऊन मजा करून चंदुलाला येत होते. आपल्या घरी खाणे त्यांना अरसिकपणाचे वाटत असे. घरे, बंगले सारे शोभेसाठी, प्रतिष्ठा दाखविण्यासाठी. त्या बंगल्यांतून खरा आनंद नसे. सुख-समाधान नसे. तेथे पैशांची पूजा होत असे. पैशासाठी तेथे सारी जमलेली. पतीने पत्नी प्रतिष्ठेसाठी केलेली, पत्नीने पती श्रीमंत म्हणून केलेला, मुलाबाळांचे आई-बापांवर प्रेम नसून पैशांवर. बाप कधी मरतो याची ती वाट पाहात असत. नोकर-चाकर पैशांसाठी वावरणारे. ते बंगले, ती प्रचंड घरे जणू स्मशानवत् होती. तेथे प्राण नव्हता. प्रेम नव्हते. सारे भूत-बंगले.

तो पाहा एक बंगला. त्याच्या आवारात सारे शांत आहे. कृष्णचुडाची झाडे हलत आहेत. नारळी डोलत आहेत. फुलांचे ताटवे शांतपणे सुगंध देत आहेत. त्या आवारात

शांती होती; परंतु भीतीही होती. तेथे उदासीनता भासे. विषण्णता अनुभवास येई. तो बंगला असूनही जणू तुरुंगातले वातावरण तेथे होते. श्रीमंती होती; परंतु प्रीतीचे मळे कोठेच नव्हते.

त्या बंगल्यातील एका सुंदर खोलीत ते पाहा, दोन गृहस्थ बोलत बसले आहेत. विजेचा मंद प्रकाश आहे. खिडक्या उघड्या आहेत. वारा येत आहे. पडदे हलत आहेत. नाचत आहेत. त्या दोघांकडे जरा नीट बघा. एक म्हातारा आहे, दुसरा मध्यम वयाचा. त्यांची कसली बोलणी चालली आहेत? ते का कट रचीत आहेत? कारस्थाने करीत आहेत? कोणाविरुद्ध कट, कोणाविरुद्ध कारस्थाने? ते का कसल्या संकटात आहेत? म्हाताऱ्याच्या तोंडावर खिन्नता आहे आणि तो पोक्त मनुष्यही सचिंत दिसत आहे. काय आहे भानगड? काय आहे प्रकार? व्यापारात का दिवाळे निघाले? का काळ्या बाजारात सापडले? बारा वाजले तरी भुताप्रमाणे ते दोघे जीव तेथे बसले आहेत? पुन्हा त्यांचे बोलणे सुरू झाले. आपण ते ऐकूया, म्हणजे कल्पना येईल.

'मी खरे ते सांगितले. तुम्ही आता फार दिवस जगणार नाही. काहीतरी व्यवस्था करून ठेवा. मी तुमचा मित्र म्हणून हे सांगतो. या संपत्तीचे काय करावयाचे? तुम्ही मिळवलीत; परंतु मरताना ती काही बरोबर येणार नाही. मी असल्या गोष्टी बोलतो म्हणून तुम्ही मला मूर्ख म्हणता. म्हणा, काहीही म्हणा. रास्त ते मी बोलणार. पुन:पुन्हा सांगणार. तुमचे जवळजवळ सत्तर वर्षांचे वय. विचार करा, आनंदराम.'

'जगजीवन, वकिली करण्यात तुझे सारे आयुष्य जात आहे. तुझ्या डोळ्यांसमोर नेहमी कायदे, कागदपत्रे, मृत्यू आणि मृत्युपत्रे, खरे ना? मी फार वर्षे आता वाचणार नाही, गोष्ट खरी. अप्रिय असली तरी खरी. परंतु या गोष्टीकडे इतके लक्ष का द्यावे? जे अपरिहार्य आहे ते होईलच. आपण सारे एक दिवस म्हातारे होणार, मरणार. जो जो जगात आला, त्याला जगाला रामराम करून जायचेच आहे. मृत्यूची कल्पना अप्रिय वाटली, तरी तो अटळ आहे. मी मरणार. जी गोष्ट मला हवी आहे, ती मिळण्यापूर्वीच मी मरणार का? दुर्दैव माझे. परंतु मरण्याचा विचार सारखा मनात का आणावा? अप्रिय वस्तूंचे चिंतन कशाला करा? मी नाही एवढ्यात मरणार. अजून मला पुष्कळ जगायचे आहे, पुष्कळ मिळवायचे आहे.'

'आनंदराम, मृत्युपत्र करून ठेवायला हवे, असे तुम्हीच नाही का अनेक वेळा म्हणालात? आज मी मुद्दाम आलो, तर तुम्हीच रागावता !'



'जगजीवन, म्हातारपण आल्यावरच मृत्युपत्र करावे, असे नाही. मी तर म्हणत असतो की, तरुणांनी सुद्धा मृत्युपत्रे करून ठेवावीत. मृत्यूचा काय नेम? माणूस आज आहे, उद्या नाही, अशी ही दुनिया. जगात कशाचा भरवसा नाही. दो दिन की दुनिया, केव्हा कोण मरेल काय सांगावे? मृत्युपत्र करून ठेवले नाही तर मागून लठ्ठालठ्ठी, झोंबाझोंबी होईल; मारामाऱ्या होतील, खून पडतील. आपले प्रिय आप्तजन; ते एकमेकांस पाण्यात पाहू लागतील. मांजराप्रमाणे एकमेकांस ओरबाडतील, चावतील. जो मेला त्याच्याविषयी त्यांना दु:ख नसते. तो मेला म्हणून त्यांना जणू आनंद होतो. गिधाडाप्रमाणे त्या मृतांच्या इस्टेटीचे लचके तोडायला ते झडप घालतात. मला किती मिळेल; कितवा हिस्सा याशिवाय बेट्यांच्या मनात दुसरा विचार नसतो. सारी क्षुद्रता; सारा स्वार्थ. मला मरणाचे वाईट नाही वाटत. मी वृद्ध झालो याचे नाही वाईट वाटत. या बंगल्यात, या जागेत उद्या कोण राहायला येणार याचा विचार मनात येऊन वाईट वाटते. मला कोणी प्रेम दिले नाही. मी आज एकटा आहे; परंतु येथे येण्यासाठी उद्या शेकडो हक्कदार उभे राहतील.'

आनंदराम बोलता बोलता थांबले. त्यांच्या डोळ्यांतून पाणी आले. परंतु पुन्हा गंभीर झाले ते. त्यांचे केस पांढरे झाले होते; परंतु त्यांच्या तोंडावर अजून तेजस्विता होती. सामर्थ्य, सत्ता यांची जणू ते मूर्ती होते. सिंह वृद्ध झाला तरीही त्याची राजेशाही ऐट कायम असते. एक प्रकारचा रुबाब, प्रतिष्ठाही आनंदरामांच्या ठायी दिसून येते.

'आनंदराम, दु:ख कशाला? तुम्ही निश्चिंत असा. तुमची प्रकृती छान आहे. अजून पुष्कळ वर्षे जगाल. तुम्ही किती श्रीमंत ! मला वाटत होते, तुम्ही सुखी असाल; परंतु तुमच्या हृदयात दु:ख आहे, शल्य आहे. होय ना? काढून टाका सारी शल्ये. मस्त राहा. उद्याच काही मृत्यू नाही येत. जे तुम्हाला हवे आहे, ते अजूनही मिळवाल नि सुखी व्हाल. तुमच्यासारख्या कोट्यधीशाने अश्रू ढाळावेत, याचे मला आश्चर्य वाटते.'

'जगजीवन, राजेमहाराजे, मोठमोठे कोट्यधीश कुबेर, यांना सुखा-समाधानाची एखादी खास सनद मिळालेली नसते. पैशाने इतर सारे मिळत असले तरी प्रेम मिळत नाही. निरपेक्ष प्रेम, स्वर्गीय प्रेम. मी चौदा-पंधरा वर्षांचा होतो तेव्हापासून मी दु:खी आहे, अ-सुखी आहे. अत्यंत परिचय असलेल्या माणसांतही आपले खरे स्वरूप समजत नसते. आपणच आपणास थोडेफार ओळखतो. जग वरवर पाहणारे. तुम्हा कायदेपंडितांकडे जे लोक येतात, त्यांची हृदये तुम्हाला थोडीच कळत असतील?

त्यांचे पैसे, खते, पत्रे हे सारे दिसेल; परंतु त्यांची मने, त्यांची ती आंतर्जीवने, तेथील सुख-दु:खे, तेथील प्रश्न यांचे ज्ञान तुम्हाला असते का? जगजीवन, तू मला ओळखणारा; परंतु तुलाही माझे स्वरूप माहीत नाही. परार्धांशानेही नाही. मी तरुणपणापासून दु:खी आहे.'

'तरुणपणापासून? ज्या वेळेस मन बेफिकीर असते, लाथ मारू तेथे पाणी काढू, असे वाटत असते, एक प्रकारचा उन्माद जीवनात असतो, त्या वेळेपासून तुम्ही दु:खी? तारुण्य म्हणजे सुखाचे, उत्साहाचे, आशेचे माहेरघर. त्या वयातही तुम्ही दु:खी होता?'

'जगजीवन, तरुणपणी सुखाला काय तोटा, असे सारे म्हणतात. परंतु कधी कधी वृद्धापेक्षाही तरुण अधिक दु:खी असतात. तसे थोडे सुख मलाही होते; परंतु फारसे नाही. काय सांगू तुम्हाला?'

'सांगा सारे. खरे सांगू का? तुम्हा श्रीमंतांची दु:खे काल्पनिक असतात. मनाच्या विकृतीची दु:खे, श्रीमंती दु:खे, असली भ्रामक दु:खे मला सांगू नका. त्यांच्याविषयी मला सहानुभूती वाटणार नाही. तुम्ही इतके श्रीमंत आणि असे सचिंत? आश्चर्य आहे हं. सांगा कोणती आहेत दु:खे?'

'जगजीवन, कोणाची सहानुभूती मिळावी म्हणून मी अधीर नाही. मी ती अपेक्षितही नाही. कारण भिक्षा मागून ती मिळत नाही. पतीला पत्नीपासून मिळत नाही, पत्नीला पतीपासून नाही. भावाला भावापासून नाही; मित्राला मित्रापासून नाही. या जगात खरी सहानुभूती दुर्मीळ आहे, मला तिची जरूरीही नाही.' आनंदराम बोलत होते. खिडकीतून आकाशातील ताऱ्यांकडे ते बघत होते. क्षणभर ते स्तब्ध राहिले.

पुन्हा म्हणाले, 'एखादे वेळेस त्या सहानुभूतीची आवश्यकता मात्र वाटते. मी अपरंपार संपत्ती मिळविली. मी अपार कष्ट केले. मी जगभर गेलो; घामाघूम झालो, परंतु इतक्या श्रमाने मी जे मिळविले ते सारे कोणाला जाणार असे मनात येऊन मला दु:ख होते. ज्याला हे सारे देईन, तो दगड निघतो की शहाणा निघतो? तू म्हणतोस की, दत्तक घ्या. हे दत्तक क्वचित्‌च बरे निघतात. कोणाला देऊ हे सारे? आज मला सर्वत्र असत्य दिसत आहे. लहान होतो, मुलगा होतो, तेव्हा सर्वत्र मंगल वस्तूंवर माझी श्रद्धा होती. हे जग चांगले आहे, असे त्यावेळी मला वाटे. मी सर्वांवर विश्वास ठेवीत असे. माझ्या मनात संशय नसे. ईश्वर चांगला आहे असे मला वाटे. जगातील सर्वांना तो सुखी करील असे वाटे. जिवंत राहणे म्हणजे स्वर्ग वाटे. सूर्याचे किरण पाहून नाचावे, फुले पाहून



हसावे. जिकडे तिकडे आनंदाची हवा, आरोग्याची हवा. आमचे मळे होते. शेती-भाती होती. आनंद, कशाची वाण नव्हती. पुढे मी ती संपत्ती वाढविली. परंतु माझे समाधान कमी कमीच होत गेले आणि आज संपत्तीच्या शिखरावर असूनही मी अतिदु:खी आहे.'

'तुमच्यासारख्या लोकांना कधीच कुठे सुख मिळणार नाही. तुम्हाला स्वर्ग मिळाला तरी तेथेही तुम्ही रडत बसाल. कामधेनू मिळाली तरी निराशेचे सुस्कारे सोडाल.'

'अरे, एखाद्या दरिद्री माणसासही तुझ्या त्या सुखाच्या स्वर्गात बसणे आवडणार नाही. तेथूनही त्याला जगातील सारी दु:खे दिसतील. कारण ती त्याला माहीत असतात. स्वर्गातील ते अमृत त्याला रुचणार नाही. गंधर्वांची गाणी नि अप्सरांचे नाच त्याला विषमय वाटतील. जगजीवन, मी असुखी आहे. कोणाला देऊ ही संपत्ती? एकदा एकाला विचारले, 'या इस्टेटीचे काय करू?' तो म्हणाला, 'एखाद्या मठाला देऊन टाका.' आज का या मठावर माझा भरवसा आहे? ईश्वरावर भरवसा शक्य तर ठेवायची माझी इच्छा आहे. परंतु मिळविलेली ही संपत्ती ज्याला द्यावी, असा एकही लायक मनुष्य मला दिसत नाही. सारा फालतू पसारा, असार पसारा. माझे लग्न दु:खातच झाले. ती एक शोककथाच आहे. पत्नीचे प्रेम मला नाही. ती पुढे मेलीही. मला दोन मुलगे होते. पैशावर त्यांचा डोळा. चैनी, मिजासी. पुढे तेही मेले. आज सत्तर वर्षांचा मी एकटाच आहे. ना प्रेम, ना सहानुभूती, म्हणून मी दु:खी आहे. प्रेमाने माझी कोणी काळजी घेईल असे कोण आहे? ज्याला मी हे माझे सारे वैभव देईन, अंत:करण भरून येऊन देईन असा जगात मला कोणीच दिसत नाही. मी दुर्दैवी आहे, सुख माझ्यासाठी नाही.'

'परंतु तुम्ही ही इस्टेट कोणाच्याच नावे केली नाही तर ती सारी सरकारजमा होईल.'

'दत्तकापेक्षा सरकारच्या ताब्यात गेलेली परवडेल. सरकार तिचा थोडा तरी चांगला उपयोग करील. खरेच, कशासाठी एवढी धडपड करून मी ही संपत्ती मिळविली?'

'आनंदराम, पैसे मिळवावे व सुखी व्हावे, याहून या जगात अधिक काय आहे?'

'जगजीवन, गरीब असूनही सुखा-समाधानात राहणारी कुटुंबे मला माहीत आहेत. परंतु श्रीमंताच्या घरात सदैव आदळआपट, धुसफूस चालू. पैसा. पैशासाठी

सारी धावपळ. हे का जीवन? शेअर बाजारातले हे भुक्कड जीवन. भांडवल घेऊन या देशात जावे, त्या देशात जावे. कोणत्याही देशावर त्यांचे प्रेम म्हणून नाही जात, तर तेथे पिळवणूक करता येईल, कमी पैशांत मजूर मिळतील म्हणूनच जातात. श्रीमंतांचे दिडक्यांवर प्रेम. चाराचे दहा, दहाचे हजार करीत राहणे ही त्यांच्या जीवनाची इतिकर्तव्यता. कागदी नोटांचे भिकारडे, श्रीमंती जीवन. त्या जीवनात उदात्तता नाही, त्याग नाही, ओलावा नाही, कृतज्ञता नाही, सुंदरता नाही. पैशाचे एक वेड. त्या वेडातून तुम्हाला कोण सोडवणार, कोण वाचवणार? परंतु माझ्या बडबडीचा तुम्हाला कंटाळा आला; होय ना?'

'नाही. मुळीच नाही. तुमचे सारे बोलणे तर्कहीन आहे, अर्थहीन आहे. परंतु गंमत वाटत आहे. बोला.'

'माझे बोलणे तर्कहीन?'

'हो, पैशाला अशी नावे नका ठेवू. हा संसार पैशाशिवाय चालत नाही. पैसा मिळविणे, तोही एक पुरुषार्थ आहे. 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' अशी म्हणच आहे. तुम्हीही शेअर बाजारात होता. पैसे मिळविलेत. सुख भोगलेत. का उगीच त्या पैशाला नावे ठेवता?'

'मी पैसे मिळविले; परंतु त्याच्याशी मी कधीही एकरूप झालो नाही. मी अप्रामाणिकपणाही केला नाही. कोणाची पिळवणूक केली नाही. मला एक बहीण होती. परंतु ती सोळाव्या वर्षीच वारली. विसाव्या वर्षी माझे आई-बाप गेले. या जगाला तोंड द्यायला एकटा राहिलो.'

'आणि चांगले दिलेत की तोंड ! गडगंज संपत्ती मिळविलीत. संसार केलात.'

'कसला संसार? त्या स्मृतीही नकोत. पत्नीने फसविले, मुलांनी फसविले आणि शेवटी सारी मेली. मला ते माझे बाल्य तेवढे आठवावेसे वाटते. ती नदी, ते जंगल, ते पाखरांपाठीमागून पळणे, स्वच्छ सूर्यप्रकाश. बहिणीबरोबर मळ्यात जायचे, फुले तोडायची; फळे खायची; गंमत. निष्पाप आनंद.'

'तुमच्या जीवनात प्रेमकथा आहे की नाही?'

'प्रेमकथा?'

'हो, तुम्हाला प्रेम सहज मिळाले असते.'

'काय बोलतोस, जगजीवन? अरे, प्रेम का विकत मिळते? प्रेम म्हणजे का बाजार? श्रीमंताला क्वचितच प्रेम मिळते. मी गरीब असतो तर एखाद्या स्त्रीचे खरे प्रेम



मला मिळाले असते. मी दिसायला वाईट नव्हतो. परंतु वयाच्या तिसाव्या-पस्तिसाव्या वर्षीच मी लक्षाधीश होतो आणि एका स्त्रीच्या प्रेमात पडलो; परंतु प्रेमात पडणे म्हणजे प्रेम नव्हे. मला वाटे की, तिला आपल्याविषयी काही वाटते. परंतु सारी वंचना. मी फसलो. तिचे प्रेम नोटांवर होते. मोत्यांच्या हारांवर होते. मी खरे प्रेम अनुभविले ते आई-बापांचे, माझ्या बहिणीचे. ते प्रेम किती मधुर, किती गोड, किती सुंदर ! परंतु ते टिकले नाही. इतके सुंदर प्रेम टिकणे कठीणच असते. माझी बहीण, माझे आई-बाप ती सारी लवकरच या जगातून गेली. त्या प्रेमाची स्मृती येते. माझ्या जीवनात ते अमर आहे. त्या प्रेमाकडे पुन: माझे मन धावते. त्या प्रेमाचा अजूनही मला ओलावा मिळतो.'

'तुमचे हे सारे पुराण राहू दे. आपण मुख्य गोष्टीसंबंधी बोलू. इस्टेट कोणाला द्यायची? एखाद्या चांगल्या घराण्यातील मुलगा दत्तक घ्या. त्याला शिकवा. पटतो का माझा सल्ला पसंत? बोला.'

'मुळीच पसंत नाही. आई-बाप मूल विकायला तयार होतील; परंतु त्या मुलाचे का प्रेम मिळणार आहे? तो कदाचित् आज्ञाधारक असेल. पैशाने विकत घेतलेली ही आज्ञाधारकता मला नको. असा कोणी आहे का की, ज्याचे खरे प्रेम मिळेल? असा माणूस मला दे.'

'पुन्हा लग्न करा.'

'आता सत्तराव्या वर्षी? जगजीवन, तू मित्र म्हणून मी रागावलो नाही. अरे, पुन्हा लग्न करायचेच असते तर पहिली बायको मेली तेव्हाच केले असते. आता गोवऱ्या स्मशानात गेल्याप्रमाणेच आहेत. आता का मी लग्न करू? आजही पैशामुळे लग्न शक्य आहे. आई-बाप आपली कोवळी मुलगीही मला द्यायला तयार होतील, माझ्या संपत्तीशी सौदा करतील.'

'अहो, सत्तर वर्षांचा म्हणजे म्हातारा? माणसे १४० वर्षे जगू शकतील. १४० वर्षांच्या मानाने तुम्ही तरुणच. पुन्हा लग्न करायला काय हरकत?'

'जाऊ दे हे विचार, मी कुठे तरी दूर जाणार आहे.'

'खरेच?'

'हो.'

'आणि गुलाबचा वाढदिवस? त्या वाढदिवसाची तुम्हाला आठवण कशी नाही? त्या दिवशी मेजवानी ना देणार आहात?'

'खरेच की, गुलाबचा वाढदिवस झाल्यावर मी जाईन.'

'ती आता किती वर्षांची झाली?'

'एकवीस.'

'ती तुम्हाला आवडते ना? तिला का नाही देत सारी इस्टेट?'

'ती एखाद्या मूर्खाशी लग्न करील अशी भीती वाटते. मला गुलाब आवडते, परंतु तिचे आई-बाप नाही मला आवडत. समुद्रकिनाऱ्यावर ही गुलाब रडत होती. चुकली होती. मी तिला पोहोचविले. असेल त्या वेळेस सात-आठ वर्षांची. तेव्हापासून मी तिला खेळणी, खाऊ पाठवीत आलो. तिच्या त्या त्या वेळच्या वयाला अनुरूप अशा देणग्या मी तिला देत आलो. ती मला आवडते इतकेच. त्यापेक्षा अधिक भावना नाही.'

'गुलाबच्या आईला वाईट वाटेल. तुम्ही अजून लग्नाच्या बाजारात उभे आहात असे तिला वाटते.'

'गरीब बिचारी गुलाब! तिची आई चांगली नाही. तिचा बापही तसाच. जीवनाचा जुगार करणारी ती आहेत. परंतु मुलगी गोड आहे. तिने स्वत:च नवरा शोधावा. आई-बापांच्या तंत्रानुसार तिने काही करू नये. आई-बाप केवळ पैशाचे लोभी आहेत.'

एकचा ठोका पडला. जगजीवन उठला.

'पुन्हा भेटाल ना, आनंदराम?'

'मी दूर जाणार आहे. तुम्हाला कळवीन.'

'माझा सल्ला नाही मानीत? नाही करीत मृत्युपत्र?'

'नाही. मी अकस्मात् कोठे मेलो तर सारे सरकारजमा होईल. होऊ दे. नाही मेलो तर काय ते पुढे बघू.'

'आनंदराम, तुम्ही मला आवडता. परंतु तुम्ही जणू कवी आहात; कल्पनासृष्टीत तुम्ही रमता.'

'माझे काव्य कधीच मेले. माझी कल्पनासृष्टी कधीच नष्ट झाली. माझी सारी सुंदर स्वप्ने कधीच भंगली.'

'परंतु अद्याप प्रेम करणारे माणूस तुम्हाला हवे आहे. निरपेक्ष प्रेम करणारे ! परंतु या जगात तसे कोणी नसते. या जगात प्रेम नाही; व्यवहार आहे. अच्छा, जे हवे आहे ते तुम्हाला मिळो. सुखी व्हा.'



असे म्हणून वकीलसाहेब गेले. आनंदराम एकटेच बसले होते. उठून ते खिडकीजवळ आले. आकाशाकडे बघत होते. पुन्हा ते टेबलाजवळ आले. त्यांनी बरीच पत्रे लिहिली. आता पहाट होत आली. तिकडे शुक्राचा तारा उगवला. आनंदरामांनी खिडकीतून तो पाहिला आणि म्हणाले, 'तो पाहा शुक्र, प्रेमाचा मंगल तारा. माझ्या जीवनप्रकाशात कधी नाहीच का तो उगवणार? खऱ्या प्रेमाचा तारा, निरपेक्ष प्रेमाचा मंगल दिव्य तारा!'

✦✦✦